प्रेस नोट दिनांक - ०९/०७/२०२६

**नामांकित दुध कंपन्यांच्या दुधामध्ये भेसळ करुन नागरीकांची फसवणुक करणाऱ्या इसमास गुन्हे शाखेने जेरबंद केले बाबत**

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष १२, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुअवि; दहिसर पुर्व मुंबई |
| गुक्र. व कलम | गु.प्र.शा., गु.र.क्रं. ७७/२०२६ कलम कलम २७४, ३४५(३), ३४७(१), ३१८(४), ३३६(३), ३(५) बी.एन.एस. सह कलम २६, २७, ३१, शिक्षा कलम ५९ व ६३ अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ नियम व नियमन २०११ (दहिसर पोलीस ठाणे गुरक्र. १०१२/२०२६ |
| गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक ०९/०७/२०२६ रोजी ०४.४५ वा. ते ०९.१० वा. |
| गुन्हा दाखल दिनांक | दिनांक ०९/०७/२०२६ रोजी १३.०१ वा. |
| घटनास्थळ | आर.एन. ०८८/३९, रुम नंबर बी-३, दुबे चाळ नंबर ०२, राजेश कंपाउंड जवळ दहिसर पूर्व, मुंबई |
| अटक आरोपींची संख्या | ०१ |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | १) अमुल, व गोकुळ या नामांकीत कंपन्यांचे २९,७५०/- रु किं. चे एकुण ४७० लिटर दुध<br>२) अमुल ताजा, अमुल गोल्ड व अमुल बफेलोच्या ३२७ बनावट रिकाम्या पिशव्या,<br>३) दुध भेसळ करणे करिता आवश्यक असलेली साधन सामुग्री<br>४) मोबाईल फोन अं.कि. १०,०००/- रु, एकुण मालमत्ता :- ३९,७५०/- |

दहिसर पोलीस ठाणे हद्दितील आर.एन. ०८८/३९, रुम नंबर बी-३, दुबे चाळ नंबर ०२, राजेश कंपाउंड जवळ दहिसर पूर्व, मुंबई याठिकाणी एक इसम नामांकित दुध कंपन्यांच्या दुधाच्या पिशवीत अस्वच्छ पाणी मिसळुन ते भेसळ युक्त दुध नागरीकांना वितरीत करत असलेबाबत कक्ष १२, गु.प्र.शा.; गु.अ.वि. मुंबई यांना गोपनिय माहिती मिळाली होती. नमुद भेसळयुक्त दुध हे लहान मुले व नागरीकांच्या आरोग्यास हानीकारक असल्याने सदर बाबत शहानिशा करण्यात आली.

त्याप्रमाणे दिनांक ०९/०७/२०२६ रोजी पहाटे मिळालेल्या विश्वसनिय माहितीची शहानिशा करुन कक्ष-१२ च्या पथकाने अन्न व औषध प्रशासन, बृहन्मुंबई महाराष्ट्र शासन येथील अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह आर.एन. ०८८/३९, रुम नंबर बी-३, दुबे चाळ नंबर ०२, राजेश कंपाउंड जवळ दहिसर पूर्व, मुंबई याठिकाणी छापा टाकुन नमुद ठिकाणी नामांकित अमुल गोल्ड, अमुल (ताजा) व गोकुळ कंपन्याच्या मुळ पिशव्या कात्रीने कापून त्या पिशव्यांमधिल दुध काही प्रमाणात बाहेर काढून त्यामध्ये मानवी सेवनास हानीकारक असे अस्वच्छ पाणी मिसळुन, त्या दुधाच्या पिशव्या स्टोव्ह पिन व मेणबत्तीच्या सहाय्याने पुन्हा सिल करुन ते नामांकित कंपन्यांचे प्रमाणित दुध आहे असे भासवुन सामान्य नागरीकांची फसवणुक करुन विक्री करण्याच्या तयारीत असलेल्या इसमास भेसळयुक्त दुध व दुध भेसळी करीता वापरण्यात आलेल्या साहित्यासह ताब्यात घेतले.

नमुद इसमाकडे अंदाजे २९,७५०/-रुपये किमंतीचे एकुण ४७० लिटर भेसळयुक्त दुध मिळुन आले ते जागीच नष्ट करण्यात आले. ताब्यात घेण्यात आलेल्या नमुद इसमाविरुध्द वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास कक्ष-१२ चे पोउनि कोते हे करीत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त( गुन्हे ) श्री अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त ( गुन्हे ) श्री कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त ( प्रकटीकरण-१ ) श्री. नवनाथ ढवळे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त ( प्र - उत्तर) श्री. रविंद्र अडाणे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप येडे-पाटील, पोनि बाळासाहेब राऊत, पोनि पुजा खांडेकर, पोनि विजय रासकर, सपोनि समीर मुजावर, सपोनि युवराज चव्हाण, पोउनि किरण कोते, पोउनि अजय सावंत, सफौ सुनिल चव्हाण, सफौ बाळकृष्ण लिम्हण, सफौ. संतोष राणे, सफौ कल्पेश सावंत, पोह संतोष बने, मपोह समृध्दी गोसावी, पोह शैलेश बिचकर, पोह नितीन पवार, पोह विजय पवार, पोह हरिश्चंद्र भोसले, मपोह अर्पिता पडवळ, पोशि चंद्रकांत शिरसाठ, पोशि स्वप्नील चंदनशिवे, पोशि अरुण धोत्रे यांनी तसेच अन्न सुरक्षा अधिकारी श्री. तुषार पांडुरंग शेळके व पथक यांनी पार पाडलेली आहे.